# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.06.2026** **वार:सोमवार**

1. योगाभ्यासानं मानसिक आरोग्याकडून शारीरिक आरोग्याकडे मार्ग प्रशस्त होतो-पंतप्रधानांचं प्रतिपादन. सुदृढ वृद्धत्वासाठी जगभरात योग महोत्सव साजरा
2. महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देणाऱ्या विधेयकांसह 10 विधेयकं पावसाळी अधिवेशनात मांडली जाणार
3. अकोला जिल्हा प्रशासनाच्या ई-भूमिती-गव्हर्नन्स प्रकल्पाला राष्ट्रीय पुरस्कार
4. FIH नेशन्स करंडक भारतीय महिला हॉकी संघानं जिंकला आणि
5. पाठ फिरवलेल्या मान्सूनची काल अनेक दिवसांनी हजेरी

**<u>योग दिवस</u>**

योगाभ्यासानं मानसिक आरोग्याकडून शारीरिक आरोग्याकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त होतो असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल योगदिनाच्या निमित्तानं बोलताना केलं.
भारतासह जगभरात काल बारावा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा झाला. कोलकाता इथं काल योगदिनाच्या झालेल्या मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः योगशिक्षक होत, सोबतच्या हजारो नागरिकांना मार्गदर्शन केलं.
योग ही केवळ शारीरिक कसरत नसून मानवी चैतन्याची अभिव्यक्ती असंल्याचं सांगून योग हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग व्हायला हवा, योग सर्वांना जोडण्याचं काम करतो असं पंतप्रधान म्हणाले.....

**योग किसी एक आयू वर्ग के लिए सिमित भी नहीं है। भारत में हम जानते हैं और देखते आए हैं। योग मानव के जीवन का चेतना के साथ, उर्जा के साथ एक प्रकाश भी है। इसलिए इस वर्ष अंतरराष्ट्रीय योग दिवस की थिम रखी गई है। योगा पर एल्दी एजिंग, उम्र बढ़ने पर भी हम स्वस्त रह सकते हैं, हम उर्जावान और सक्रिय रह सकते हैं। योग हमें इसके लिए मार्ग दिखाता है।**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मध्यप्रदेशात जबलपूर इथं आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी काल महाराष्ट्र लोकभवन इथं भारतीय तटरक्षक दलातील अधिकाऱ्यांसह योगसत्रात सहभाग घेतला. यावेळी कैवल्यधामचे योग प्रशिक्षक दिलीप दौनेरिया यांनी योग आणि प्राणायाम सत्राच मार्गदर्शन केले.
यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राज्यपालांनी राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांना योगाचा प्रचार-प्रसार करण्याचे तसेच जगासाठी उत्तम योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवण्याचं आवाहन केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जुहू चौपाटीवर झालेल्या योग दिन कार्यक्रमात सहभागी झाले होते.
बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पुणे महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांच्याद्वारे आयोजित योग कार्यक्रमात सुमारे 5 हजार नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. राज्याचे शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह आणि शिक्षण उपसंचालक डॉक्टर गणपत मोरे यांनी पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेत झालेल्या योगासन प्रात्यक्षिकात, सहभाग घेतला. पिंपरी चिंचवड महानगर पालिका शाळांमध्येही योगदिन उत्साहात साजरा झाला.

पुणे जिल्हा परिषदेत योग प्रशिक्षक माधवी मागलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासनं, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली. राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये आयोजित योगाभ्यासाच्या कार्यक्रमांमध्ये, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभागी होत योगाभ्यास केला.

**पावसाळी-अधिवेशन**

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन, आजपासून मुंबईत सुरू होत आहे. तीन आठवडे चालणाऱ्या या अधिवेशनात, शेतकरी महिला कायदेशीर दर्जा देण्यासह दहा विधेयके मांडण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल संध्याकाळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार या वेळी उपस्थित होते.
यावेळी कर्जमाफीविषयी सरकारची भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**असा विचार आम्ही केला नाही. कारण आमच्या करता कर्जमाफी नाही. हा राजकीय विषय नाही. आमच्या करता कर्जमाफी ही शेतकऱ्यांकरिता एक. आपल्याला आमचा शेतकरी जगला पाहिजे. आमच्या शेतकऱ्याला पुन्हा कर्ज घेण्याची शक्ती प्राप्त झाली पाहिजे. या अर्थाचं एक इन्स्ट्रुमेंट. एक उपकरण म्हणून आम्ही कर्जमाफी कडे पाहतो. यापूर्वीही जेव्हा मी कर्जमाफी केली होती तेव्हा मी सांगितलं होतं की कुठल्याच कर्जमाफीने शेतकरी कधी श्रीमंत झाला नाही. कर्जमाफी हा काही परमनंट उपाय पण नाही. पण परिस्थितीनुरूप आपल्याला कर्जमाफी करावी लागते.**

कमी पाऊसमान ही चिंतेची बाब असली तरी शेतकऱ्यांनी मार्गदर्शक सूचनांच पालन करत पेरणी करावी, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**विरोधकांचा-बहिष्कार**

महाविकास आघाडीने पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकला.
विरोधी नेत्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्यावर दुष्काळाचे संकट असून सुका दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी केली.
विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी, राज्यावरील कर्ज साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनल्याची टीका केली.
राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कोलमडल्याचा आरोप केला.

**नांदेड गुरुद्वारासाठी नवीन कायदा**

नांदेड इथंल्या दि नांदेड शीख गुरुद्वारासाठी, 1956 मध्ये करण्यात आलेला कायदा रद्द करून, त्याऐवजी संपूर्ण नवीन कायदा लागू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाच्या वतीने हा प्रस्ताव सादर केला.

नांदेडच्या या गुरुद्वारामध्ये देश-विदेशातून येणाऱ्या दर्शनार्थींच्या संख्येत गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढ झाली असून प्रशासकीय कामकाजाची व्याप्तीही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर, 1956 च्या कायद्यातील अनेक तरतुदी आता कालबाह्य झाल्याचे समोर आले होते.

**मतमोजणी**

राज्य विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी आज होणार आहे. सहा जागांवर निवडणूक बिनविरोध झाली आहे.

**ई-भूमिती पुरस्कार**

अकोला जिल्हा प्रशासनाच्या नाविन्यपूर्ण 'ई-भूमिती-गव्हर्नन्सच्या प्रकल्पाला देशातील प्रतिष्ठित मानला जाणारा स्कॉच पुरस्कार प्राप्त झाला आहे. नवी दिल्ली इथ आयोजित 108 व्या स्कॉच समिटमध्ये जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

प्रशासन, सुशासन, डिजिटल परिवर्तन, सामाजिक विकास, वित्तीय समावेशन आणि सार्वजनिक सेवा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा स्कॉच पुरस्कार हा देशातील अत्यंत मानाचा राष्ट्रीय पुरस्कार मानला जातो.

'ई-भूमिती' हा जिल्ह्यातील विविध शासकीय मालमत्ता, सुविधा आणि सेवांचे भू-स्थानिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल मॅपिंग करणारा अभिनव उपक्रम आहे.

या प्रकल्पांतर्गत शाळा, अंगणवाडी केंद्रे, रेशन दुकाने, आरोग्य संस्था, जलस्रोत, डिजिटल सेवा केंद्रे, शासकीय कार्यालये, तसेच इतर सार्वजनिक सुविधांची अचूक भौगोलिक माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**<u>नीट</u>**

पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी NEET-UG 2026 ची पुनर्परीक्षा काल कडक सुरक्षा व्यवस्थेत पार पडली असं राष्ट्रीय चाचणी संस्थेनं सांगितलं. भारतातील पाचहजारपेक्षा जास्त आणि परदेशातील 14 केंद्रांवर 20 लाखांहून अधिक उमेदवारांनी ही पुनर्परीक्षा दिली. दहा हजारांहून अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांचा यात समावेश होता. तसंच, वैद्यकीय समस्या असलेल्या 81 उमेदवारांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

**<u>हॉकी</u>**

महिलांच्या हॉकीमध्ये FIH नेशन्स करंडकासाठी ऑकलंड इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं यजमान न्यूझीलंडचा 2-0 असा पराभव करून दुसरं विजेतेपद पटकावले आणि महिला प्रो लीगमध्ये स्थान निश्चित केलं. अंतिम सामन्यात लालरेमसियामीनं सामनावीर पुरस्कार पटकावला, तर दीपिकाने स्पर्धेत एकंदर सहा गोल करत सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा सह-पुरस्कार मिळवला. संपूर्ण स्पर्धेत भारत अपराजित राहिला. हॉकी इंडियाने संघातील प्रत्येक खेळाडूला 3 लाख रुपये आणि सहकारी सदस्याला दीड लाख रुपये रोख बक्षीस देण्याची घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजेत्या संघाच अभिनंदन केलं आहे.

**<u>पाऊस</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात दमदार प्रवेश केल्यानंतर लगेचच पाठ फिरवलेल्या मान्सूनच्या पावसानं काल अनेक दिवसांनी हजेरी लावली. सकाळी 11 वाजल्यानंतर ढगाळ वातावरण तयार झालं आणि काही भागांमध्ये पावसाच्या काही सरी कोसळल्या. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वांनाच थोडा दिलासा मिळाला आहे.

सातारा शहरासह तालुक्यातील विविध भागात काल जोरदार पावसाला सुरुवात झाली.

पुणे आणि परिसरात काल दुपारी साडेतीन वाजल्यानंतर अर्धा तास वीजांसह पावसाच्या जोरदार सरी पडल्या. या बहुप्रतीक्षित पावसामुळं सर्वत्र गारवा आला.

**<u>हवामान</u>**

राज्यात तुरळक ठिकाणी वीजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.